# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर ,
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.
फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९
ई-मेल- jtdirrom@gmail.com website – www.jdteromumbai.com


परिपत्रक
**कालमर्यादा दि. ७/७/२०१७ पर्यंत**

क्र. २/विकामुं/तंशि/इबीसी/२०१७/ १८४।

दिनांक : 27 JUN 2017

प्रति,
सर्व शासकीय, अशासकीय विनाअनुदानीत,
खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित
एमबीए, एमसीए, वास्तुशास्त्र, अभियांत्रिकी पदवी/पदविका,
औषधनिर्माणशास्त्र पदवी/पदविका महाविद्यालये.

विषय : शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र.टीइएम/२०१५/प्र.क्र.२१९/तांशि-४, दि. ३१/०३/२०१६ मधील अनु.क्र.१२ येथील अटीच्या अनुषंगाने कार्यवाहीबाबत

संदर्भ :१. शासन पत्र क्र. संकिर्ण-२०१७/प्र.क्र.११७/तांशि-४, दि. १७ मे, २०१७
२. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. १५/अर्थसं/ ईबीसी/२०१७-१८/४९, दि. १९/०६/२०१७
३. उच्च वतंत्र शिक्षण विभाग, शा.नि. क्र. टीइएम-२०१५/प्र.क्र.२१९/तांशि-४, दि. १३/०३/२०१६

उपरोक्त संदर्भांकीत विषयानुसार सर्व संबंधीत संस्थांना कळविण्यांत येते की, संदर्भीय क्र. ३च्या शासन निर्णयातील मुद्दा क्र. १२ अन्वये *"परंतु असे पात्र लाभार्थी विद्यार्थी अभ्यासक्रमास प्रवेश घेतल्यानंतर संपूर्ण अभ्यासक्रमाच्या एकूण कालावधीत दोन किंवा त्यापेक्षा अधिक वेळी पूर्णतः अनुत्तीर्ण झाल्यामुळे त्या अभ्यासक्रमाच्या पुढील शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश मिळाला नसेल तर संबंधीत विद्यार्थी प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमाच्या उर्वरित कालावधीसाठी सदर योजनेंतर्गत लाभाकरिता कायमस्वरुपी अपात्र ठरेल."* अशी अट शिक्षण प्रतिपूर्तीच्या अनुषंगाने नमूद करण्यांत आलेली आहे.

परंतु राज्यभरातील विद्यार्थ्यांकडून प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने वरील अट पूर्वलक्षी प्रभावाने लागू न करता ती शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षात नव्याने प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लागू करण्यात यावी. असे शासनाचे आदेश आहेत.

सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षामध्ये ऑनलाईन अर्ज भरतांना वरील नमूद अटीच्या कारणास्तव पात्र लाभार्थी विद्यार्थी लाभापासून वंचित राहिले आहेत. मात्र अशा लाभार्थी विद्यार्थ्यांना लाभ देणे आवश्यक असल्याचे संदर्भीय क्र.२च्या पत्रान्वये मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांनी असे कळविले आहे की, सर्व संस्थांकडून अशा विद्यार्थ्यांचे ऑन लाईन अर्ज न मागविता ऑफ लाईनद्वारे अर्ज प्राप्त करुन घ्यावेत व सोबतच्या एक्सेल शिट मध्ये माहिती संकलीत करुन अभ्यासक्रमनिहाय विद्यार्थी संख्या व देय असणाऱ्या एकूण रकमेबाबत तात्काळ प्रस्ताव सादर करण्यांत यावेत. जेणेकरुन शासनाकडे अनुदानाची मागणी करणे शक्य होईल.

सहपत्रे : वरीलप्रमाणे

सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स - २२६९२१०२

E-Mail :- 1) System@dte.org.in 2) Desk15@dte.org.in internet:- http://www.dte.org.in


क्रमांक :-१५/अर्थसं/ईबीसी/२०१७-१८/ ४८

दिनांक: - 19 JUN 2017

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

**मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर .**

विषय :- शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. टीइएम/२०१५/प्र.क्र.२१९/तांशि-४, दि. **३१.०३.२०१६ मधील अनु. क्र. १२ येथील अटीच्या अनुषंगाने कार्यवाहीबाबत...**

संदर्भ : शासन पत्र क्र. संकिर्ण-२०१७/प्र.क्र.११७/तांशि-४, दिनांक १७ मे २०१७

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय शासन पत्राच्या अनुषंगाने विभागीय कार्यालयांना कळविण्यात येते की, "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना" या योजेबाबत शासन निर्णयातील मुद्दा क्र. १२ येथे " परंतु असे मात्र लाभार्थी विद्यार्थी अभ्यासक्रमास प्रवेश घेतल्यानंतर संपुर्ण अभ्यासक्रमाच्या एकूण कालावधीत दोन किंवा त्यापेक्षा अधिक वेळा पुर्णत: अनुतीर्ण झाल्यामुळे त्या अभ्यासक्रमाच्या पुढील शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश मिळाला नसेल तर संबधित विद्यार्थी प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमाच्या उर्वरित कालावधीसाठी सदर योजनेतंर्गत लाभाकरिता कायमस्वरूपी अपात्र ठरेल" अशी अट शिक्षण शुल्क प्रतिपुर्तीच्या अनुषंगाने नमुद करण्यात आलेली आहे.

परंतु राज्यभरातील विद्यार्थ्यांकडून प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने वरिल अट पुर्वलक्षी प्रभावाने लागू न करता ती शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून व्यवसायिक अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षात नव्याने प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लागू करण्यात यावी. असे शासनाचे आदेश आहेत.

सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षामध्ये ऑन-लाईन अर्ज भरतांना वरील नमूद अटीच्या कारणास्तव पात्र लाभार्थी विद्यार्थी लाभा पासून वंचित राहीले आहे, मात्र अशा लाभार्थी विद्यार्थ्यांना लाभ देणे आवश्यक असल्याने आता ऑन-लाईन अर्ज न मागविता ऑफ-लाईनद्वारे अर्ज प्राप्त करुन घेण्यासाठी आपल्या अधिपत्याखालील संबंधित सर्व संस्थांकडून सोबतच्या एक्सेल शिट मध्ये माहीती संकलीत करुन विभागीय कार्यालय निहाय एकूण पात्र लाभार्थी विद्यार्थी संख्या व देय असणारी एकूण रक्कमेबाबत प्रस्ताव तात्काळ सादर करण्यात यावे. जेणे करुन शासनाकडे वाढीव रकमेसाठी मागणी करणे शक्य होईल.

सोबत :- विवरणपत्र

(चंद्रशेखर ओक) भा.प्र.से.

संचालक,

तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई .

EBC

22/6/17

सहसंचालक, तंत्रशिक्षण

विभागीय कार्यालय, मुंबई ५१.

आवक क्रमांक : 4433

दिनांक :